# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहा. आयुक्त एम/पूर्व विभाग यांचे कार्यालय, २०३, २ रा मजला, एम/पूर्व विभाग कार्यालय इमारत,
कै. मधुकर तुकाराम कदम मार्ग, दुर्गादेवी चौक, गोवंडी (प), मुंबई - ४०००४३.

क्र. स. आ./एम-पूर्व/५७९/व्यय दि.०९/१०/२०२४

## स्थळदरपत्रिका सुचना

एम/पूर्व विभागाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सह संस्था, बेरोजगार सेवा सह संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थामार्फत **देवी विसर्जण-२०२४ करिता एम/पूर्व विभागामार्फ़त ट्रॉम्बे जेट्टी व आशिष तलाव या नैसर्गिक विसर्जन स्थळी भाविकांना विविध सेवासुविधा पुरविण्याकरिता अकुशल कामगारांचा पुरवठा करण्यासाठी** दि.०९/१०/२०२४ ते दि.११/१०/२०२४ रोजी दुपारी ०३.०० पर्यंत अर्ज मागविण्यात येत असून सदर कामाकरिता इच्छुक असलेल्या संस्थेस दि.११/१०/२०२४ रोजी दुपारी ०३.०० पर्यंत एम/पूर्व विभागातील व्यय खात्यामार्फ़त चलन देण्यात येईल.

अर्जाच्या प्रतीकरिता, एम/पूर्व विभाग कार्यालयातील व्यय विभागाकडे रु.३३०/- अधिक १८ टक्के जीएसटी इतकी रक्कम रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. (बृहन्मुंबई महानगरपालिका) (Brihanmumbai Municipal Corporation) या नावाने (ना-परतावा) नागरी सुविधा केंद्र (CFC) येथे जमा करावी तसेच इसारा रक्कमेपोटी रक्कम रु.१४,०००/- इतक्या रक्कमेचा भरणा केलेल्या चलनाची प्रत दि.०९/१०/२०२४ ते दि.११/१०/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत अर्जासोबत व्यय विभागाकडे सादर करण्यात यावी. तसेच इच्छुक संस्थांनी दि.११/१०/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजेनंतर सादर केलेले अर्ज व कागदपत्रे विचारात घेतले जाणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

प्रस्तुत कामाकरिता आवश्यक असणा-या अशासकीय कामगारासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिपत्रक क्र. प्रकाअ/०१/२०२४-२५ दि.१२/०४/२०२४ अन्वये किमान वेतन रक्कम रु.७६४.०३ प्रतिदिन प्रति अकुशल कामगार या दराने विषयांकित काम पार पाडण्यास इच्छुक असलेल्या यशस्वी संस्थेस सोडतीद्वारे नियुक्त करून कार्यादेश देण्यात येणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी. सदर विविध कामाकरिताचे सविस्तर अर्ज व्यय विभागाकडून विहीत शुल्क भरून प्राप्त करण्यात यावेत.

सही/-

**विभाग कार्यकारी अभियंता एम/पूर्व**